# मुंबईत ‘विश्वचषक गॅलरी’ उभारणार -उद्धव ठाकरे

**प्रतिनिधी**

‘येत्या २५ तारखेच्या आत, मुंबईत अंधेरीच्या शहाजीराजे क्रीडा संकुलात ‘विश्वचषक गॅलरी’ सुरू करण्यात येऊन भारताने विश्वचषक जिंकल्याचा रोमहर्षक, आनंददायी क्षण चिरस्थायी करण्यात येईल’, अशी घोषणा शिवसेनेचे कार्याध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी काल मुंबईत एका कार्यक्रमात केली.

मैत्रेय प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या द्वारकानाथ संझगिरी लिखित ‘माझी बाहेरख्याली’ या पुस्तकाच्या प्रकाशनानंतर रंगलेल्या गप्पांमध्ये ते बोलत होते. या गप्पांमध्ये ठाकरे यांच्यासोबत अभिनेते मिलिंद गुणाजी व द्वारकानाथ संझगिरी सहभागी झाले होते.

राजकारणाला जराही स्पर्श न करता सुमारे तासभर रंगलेल्या या भटकंतीविषयक गप्पांत या तिघांच्या भटकंतीचे तसेच व्यक्तिमत्त्वाचे अनेक अप्रकाशित पैलू प्रकाशात आले. ‘मुंबईत क्रिकेटचं म्युझियम असलं पाहिजे’ असे मत संझगिरी यांनी व्यक्त करताच ठाकरे यांनी वरील घोषणा केली.

ते म्हणाले, ‘२०११ साली आपण विश्वचषक जिंकला. त्यामुळे याच वर्षात विश्वचषक गॅलरीच्या रूपाने हे म्युझियम साकारले जावे यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे.’

तुम्ही ‘एम.सी.ए.’त कधी जाणार, असा प्रश्न विचारला असता ते म्हणाले, मला क्रिकेट आवडते हे जरी खरे असले तरी खेळात राजकारण

जसे येऊ नये, तसेच त्या प्रांतात राजकारणीही येऊ नयेत अशा मताचा मी आहे. ते क्षेत्र स्वतंत्रच राहिले पाहिजे आणि आम्ही राजकारण्यांनी त्यांच्या मागे आमचे बळ उभे केले पाहिजे.

ठाकरे व गुणाजी हे दोघेही क्रिकेटप्रेमी. आपल्या क्रिकेटप्रेमाबद्दल गुणाजी म्हणाले, ‘आम्ही दोघे खूप क्रिकेट खेळलोय. उद्धव खूप छान बॅटिंग करतो. तो ‘स्ट्रेट बॅट’ने खेळतो. प्रत्यक्ष जीवनातही तो ‘स्ट्रेट बॅट’नेच खेळतो. आम्ही कुठे कुठे क्रिकेट खेळलोय! अगदी हेलिकॉप्टरच्या एअर स्ट्रिपवरही आम्ही क्रिकेट खेळलोय.’

ठाकरे व गुणाजी यांनी एकत्रित प्रवासही बराच केलाय. त्याचे काही किस्सेही या दोघांनी सांगितले. उद्धवजींनी केलेल्या किल्ल्यांच्या हवाई छायाचित्रणाच्या वेळचा एक किस्सा सांगताना गुणाजी म्हणाले, ‘अलंग-कुलंग किल्ल्यावर जाण्याची माझी खूप इच्छा होती. पण माझा खांदा ‘डिस्लोकेट’ झाल्यामुळे मी ते करू शकत नव्हतो. पण माझी ही इच्छा पूर्ण करण्यासाठी उद्धवने ते हेलिकॉप्टर इतके  खाली आणवले, की आम्ही जवळ-जवळ गडमाथ्याला चाटून गेलो. तो अविस्मरणीय अनुभव मी कधीही विसरणार नाही.’

या वेळी कोणत्याही भटकंतीचा अविभाज्य भाग असलेल्या खाद्ययात्रेचे रसभरित तसेच चमत्कारिक किस्से तिघांनीही सांगितले. वन्य जीवनाच्या छायाचित्रणाचे किस्से सांगताना उद्धव ठाकरे म्हणाले, ‘शहरातील माणसांमध्ये अनेकदा जेवढी सभ्यता दिसत नाही तेवढी जंगलातल्या प्राण्यांत दिसते. वाघासारखा प्राणी तर डिवचल्याशिवाय

सहसा अंगावर येत नाही. शिवसेनेचा वाघही तसाच आहे!' पण कॅमेरा हातात आला आणि माझा ब्रश मागे पडला हे माझे दुर्दैव, अशी खंतही त्यांनी बोलून दाखविली.

या वेळी मैत्रेय उद्योग समूहाच्या अध्यक्षा व व्यवस्थापकीय संचालिका वर्षा सत्पाळकर यांनी मैत्रेय प्रकाशनचा आढावा घेतला. त्या म्हणाल्या, की, 'फ्लिपकार्ट.कॉम व बुकगंगा.कॉम या माध्यमातून आमची सर्व पुस्तके आम्ही ई-बुक स्वरूपातही सादर केली असून, पुढेही हाच वसा चालविण्याचा आमचा निर्धार आहे'.

या वेळी बुकगंगा.कॉमचे संजय पेठे यांनी ई-बुक संकल्पनेविषयी माहिती दिली.